# नागपुर, महानगरपालिका,नागपूर

## स्थानिक संस्था कर विभाग

रेल्वेफिडर रोड, संत्रामार्केट, नागपूर–४४००१८

## व्यापाऱ्यांना आवाहन (सुचना पत्रक)

नागपूर महानगरपालिका नागपूर क्षेत्रातील सर्व व्यापाऱ्यांना आवाहन करण्यात येते कि, शासनाने नागपूर महानगरपालिका नागपूर क्षेत्रात जकात करा ऐवजी दि. १/४/२०१३ पासून स्थानिक संस्था कर लागू केला आहे.

त्यासाठी महापालिकेस सहकार्य करण्यासाठी आपणास विनंती करण्यात येते की

१. शासनाने नागपूर महानगरपालिकेसाठी मंजूर केलेल्या स्थानिक संस्था कर नियमावलीतील नियम ३ नुसार ज्या व्यापाऱ्यांची सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची वार्षिक उलाढाल नियम ३ नुसार १ लाखाच्या वर आहे अशा मालाची खरेदी किंवा विक्रीची किंवा सर्व नसो अशा सर्व व्यापाऱ्यांनी नमुना 'क' (नियम ४ व ६) मध्ये नोंदणीसाठी अर्ज करून नोंदणी प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. नोंदनीसाठी अर्ज महानगरपालिकेचे झोन कार्यालय तसेच जकात नाका क्र.१३, संत्रा मार्केट, नागपूर येथे भरून जमा करता येईल.

२. ज्या व्यापाऱ्यांचे एका पेक्षा अधिक धंदे महापालिका क्षेत्रात आहेत त्यांनी एकच नोंदणी प्रमाणपत्र घेता येईल आणि नोंदणी प्रमाणपत्राच्या एकापेक्षा अधिक प्रती स्विकारून प्रत्येक धंदायाच्या ठिकाणी प्रदर्शित करणे बंधनकारक आहे.

३. स्थानिक संस्था कर नोंदणी करीता खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
१) करारनामा, लिव्ह एन्ड लायसन्स (भाडे करारनामा) २) व्यवसायाच्या जागेचा पुरावा (लाईट बिल/टॅक्सपावती) ३) बी.एस.टी/सी.एस.टी/पॅन/वॅट ची प्रत ४) वास्तव्याचा पत्ता (रेशनकार्ड/पासपोर्ट / टेलिफोन बिल यापैकी कोणतेही दोन ५) इगुमास्ता परवाना ची प्रत ६)बॅकेचे स्टेटमेंट (चालू महिन्याचे/नांव/पत्ता/खाते क्रमांक) इत्यादी ७) संस्थेचे उद्देश पत्रिका (लागू असल्यास) ८) मंडळाचा ठराव किंवा संचालकांचे नियुक्ती पत्र (लागू असल्यास) ९) दोन पासपोर्ट साईज फोटो १०) भागीदारी करार (लागू असल्यास) ११) महिन्याप्रमाणे खरेदी अहवाल (नोंदणी तारखेपर्यंत) १२) ताळेबंद पत्रक सन २०११–२०१२, १३) मालमत्ता कराचे देयक १४) जे व्यापारी व्हॅट चे नोंदणीधारक असतील त्यांना स्थानिक संस्था करासाठी डिम व्यापाऱ्यांनी त्याचे धंदयाचे तपशिल फॉर्म भरावा व इतरांनी अर्जासोबत नोंदणी शुल्क रू. १००/– भरणे आवश्यक आहे.

४. जे व्यापारी दि. १ एप्रिल २०१३ पासून ३० दिवसांचे आत नोंदणी करून घेणार नाही अशा व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करातील नियम ९ (१) नुसार महापालिका क्षेत्रात धंदा करता येणार नाही.

५. प्रत्येक व्यापाऱ्यांने खरेदी केलेल्या आणि हस्तारणांच्या तत्वावर मिळालेल्या मालाची या नियमातील नमुना 'घ' मध्ये एक विवक्षित नोंदवही ठेवणे बंधनकारक आहे.

६. प्रत्येक व्यापारी नोंदणी प्रमाणपत्र घेतल्यानंतर स्थानिक संस्था कराचा नोंदणी क्रमांक कॅश मेमोवर प्रिंट करेल/छापेल/स्टॅम्प मारणे बंधनकारक आहे.

७. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम १५२ (ग) व नियम २२ नुसार प्रत्येक नोंदणीकृत व्यापाऱ्यांने दुसऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्यास माल विकेल किंवा एखादा नोंदणीकृत व्यापाऱ्यांने अन्य व्यक्तीस दहा रूपयापेक्षा अधिक किंमतीचा माल विकेल तर त्याने किंवा त्यांचे नोकराने, व्यवस्थापकाने,मालकाने, अभिकर्त्याने अनुक्रमांक व दिनांक यांसह सही केलेले आणि विहीत करण्यात येईल असा तपशिल दर्शविणारे देयक किंवा रोखीचे टिपण खरेदीदारास देईल व अशा देयकांची किंवा रोखीच्या टिप्पणीची अनुक्रमांक घातलेली सही केलेली व दिनांक नमुद केलेली स्थळप्रत किंवा दुसरी प्रत स्वत:कडे ठेवील

८. नियम ६ नुसार प्रत्येक भागीदारी संस्थेचा कोणताही करार असला तरी या नियमान्वये प्रत्येक भागीदार स्थानिक संस्था कराची रक्कम भरण्यास जबाबदार असेल.

९. नियम २९ नुसार प्रत्येक नोंदणीकृत व्यापारी आपल्या स्वाक्षरीने नमूद ड–१ मध्ये सहामाही व नमूद ड–२ नुसार वार्षिक विवरणपत्र सादर करील.

१०. नियम ४८ अन्वये व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था कराची देय रक्कम पुढील महिन्याच्या १० तारखेच्या आत पदनिर्देशित बॅंकेत भरली नाही तर दरमहा दोन टक्के व्याज आकारले जाईल.

११.या संदर्भातील स्थानिक संस्था कर नियम २०१० तसेच आवश्यक माहिती नागपूर महानगरपालिकेचे संकेत स्थळ **www.nmcnagpur.gov.in** वर उपलब्ध आहे.